# बातमी




राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आयुष्यमान भारत कार्यक्रमामध्ये आरोग्य वर्धीनी केंद्र सुरु झालेली आहेत. या केंद्रांमध्ये प्रसुतीपुर्व व प्रसुती सेवा, नवजात अर्भक व नवजात शिशुंना सेवा, बाल्यावस्था व किशोरवयीन आरोग्य सेवा लसीकरण सेवा, कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक व प्रजनन संबंधी आरोग्य सेवा व योग व आयुर्वेद उपचार पध्दती व इतर सेवा प्रदान केल्या जातात.

या केंद्रांमध्ये योग प्रशिक्षण घेणेसाठी योग प्रशिक्षक यांची योग प्रशिक्षणासाठी निवड करावयाची आहे. सातारा जिल्हयातील ७ तालुक्यामध्ये (वाई, खंडाळा, महाबळेश्वर, फलटण, जावळी, माण व खटाव या तालुक्यातील उपकेंद्र) योग प्रशिक्षक प्रशिक्षणासाठी तात्पुरत्या स्वरुपात घ्यावयाचे आहेत. योग प्रशिक्षकाला प्रत्येक आठवडयाला प्रत्येक उपकेंद्रामध्ये १ शिबिर घ्यावयाचे आहेत. त्यासाठी प्रति शिबिर रु.५००/- प्रमाणे योग प्रशिक्षकांना मानधन अदा केले जाणार आहेत. जिल्हयातील ज्या योग प्रशिक्षकांकडे योग प्रशिक्षण पुर्ण केलेचा दाखला असेल अशा प्रशिक्षकांनी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जि.प. सातारा याठिकाणी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन श्री. संजय भागवत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांनी केले आहे.

संपर्कासाठी ०२१६२-२३५९४८ व ०२१६२-२३००३५